# १७

# गुजराथचा जलप्रलय !

## पोवाडा.

गरीबांच्या मदतीला चला, । ईश्वरी घाला । गुजराथीं आला । त्यांत कितिकांचा झाला संहार । बेकार झाले कैक हज्जार । वाहुनि गेली कितिक घरदार ॥ ध्रु० ॥

—: १ :—

**तारीख** पंचवीस जुलै सोमवार । घोराहून घोर । पाण्याचा पुर । आला, तंवा वाटे मोठा प्रळेकाळ । जणू काय खालीं पडलं आभाळ । भीतिला नाहीं राहिला हो ताळ ॥ गरिबीनं केलं लोकास । आधीं कासविस । त्यांत हा त्रास । हाय ! अगणित आला आयास । कोपला देव, एक विश्वास । कोणाचा आता

सांगा जीवास ? ।। आधीं एक मोडकी झोंपडी । आणि ही कुडी। बाळबापडीं । तीं ही वरपडीं झालीं दुःखास । त्यांत कितिकांचा जाहला नाश । ठाव एक संख्या चित्रगुप्तास ! ।। शेषशाई गेला हादरून । सूर्य दचकून । गेला लोपून । वारा पण झाला सारा थंडगार । इंद्रानं धरला घोर आकार । तांडवनाच नाचे शंकर ।। झाडं वाजति हो कडकडा । घर धडधडा । चालला धुमधडा । रडारड झाली । शहारा आला ।। कोण ह्मणती वाचवा मला, । माझ्या बाळाला । माझ्या बायकोला । हाल जीवाला ।। आतां कथा सारी घडलेली सांगे शाहीर ।। गरीबांना आतां दादांनों ! काय देणार ? ।। असो ऐका गोष्ट मेसुर । मग करा आपला निर्धार । दोन दिवस पडला पाऊस मोठा घनघोर ।। खळ नाहीं, सारखी लागली पाण्याची धार ।। आधीं नुसत्या पावसानंच किती बसलं घरदार ।। सोमवारीं रात्रीं हा घडला सारा प्रकार ।। टेंभीचा फुटला तलाव, लोक बेजार ।। टेंभी, हर्णी, मकर–पुरा, झालीं गांवं ही गार ।। विश्वामित्री नदी कोपली आला हो पूर ।। आलं पाणी बडोदे शहरांत बेऽसुमार ।। चार पुरुष पाणी राहीलं रस्त्यावर ।। पाणी मध्यरात्रीला चढलं दुमजल्यावर ।। चाल ।। भिंतीचा चिखल मग झाला । तळमजला खालीं घसरला । किती निजले होते जागेला । तुळयानीं त्यांचा चूर केला ! । नाका-तोंडांत पाणी जाऊन, जीव घुस्मटुन लोक किती मेला ! ।।





पाण्याचा लोंढा पाहिला । कोण वरच्या मजल्यावर गेला । पर खालीं सारा कोसळला । चिखलांत गेला मिसळून नाहींसा झाला ! ।। कोण रडती जीव कोंडला । कोण ह्मणती ' मेलों हो मेलों राखा जीवाला ' ।। कोण ह्मणती ' काढा पोराला ' । पर कोण जाणार बोला ! । घडी घडी इमला तडकला । सहा हजार इमला धुळीला । मिळाला एकाच गांवाला । आणि किती आले भूमिला ठाव कोणाला ? ।। (चाल) ।। मृत्युचा भरला दरबार । असला हा घोर । केला संभार । भूमिचा कमी, काय समजेना । गरीबाला झाल्या यातना । काय थोरांना । नाहीं कल्पना । राखा दीनांना ।। १ ।।

—: २ :—

**कोण** बसती धरून झाडाला । कोण तारेला । कोण छपरावरती जाऊन राखती जीवाला । तीन दिवस नाहीं झोंपेला नाहीं अन्नाला । हाय ! खालीं जळसागर कोपला ।। आली घेरी हात सुटला पाण्यामधीं पडला । घुस्मुटुन कैकांचा जीव देहांतुन गेला । असा काळ आला काय ठाव होता कोणाला । काय नशीब फुटलं करुणा नव्हति दैवाला ।। एका बाइनं मूल बांधलं आपल्या पोटाला । पर अंतकाल दोघांचा एकदम आला ।

पाण्यांत घुस्मटुन सोडलं त्यांनीं जीवाला । कधीं सांगा कोणी देखावा असा पाहिला ? ॥ ज्या झाडावरनं असा लोक होता बसलेला । तीच झालीं झाडं आधार कितिक सापांला । आधार सापांचा त्यांना, त्यांचा सापांला । दोघांच्या जीवाला घाला एकदम आला ! ॥ चाल ॥ दोन दिवस गेल्यावर महापूर ओसरला ॥ घरदार माणसं किती मेलीं—अंदाज केला ॥ सहा हजार घरदार मोडलं, कहर हा झाला ! ! ॥ किती मुडदे कुजलेले घोर दिसती त्या वेळा ॥ किती प्रेतं सडलेलीं दिसतीं जागजागेला ॥ धनधान्य नासून गेलं—घाण गांवाला ॥ गाडीचा रस्ता बिघडला । तारांचे खांब भूमिला । बाहेरची बातमी समजेना, बंदी डाकेला ॥ जगलेले लोक मग दुवा देती कोणाला ? । जो गेला त्यांच्या मदतीला । तो धन्य धन्य हो झाला ! । कोणी केली मदत दीनाला सांगतों तुह्मांला ॥ कुमार धैर्यशीलराव आले स्वतः मदतीला ॥ दिलदारपणा हाच योग्य राजपुत्राला ॥ सरदार मुजुमदार दाजोसाहेब तांबे त्या वेळा ॥ माणिकराव, अभ्यंकर आले साह्य देण्याला ॥ नारायणगुरुंच्या तालमी, माणिकरावांचा व्यायाममेळा ॥ ब्रह्मपुरीमंडळ हो आलं हात देण्याला ॥ हरिभक्ति, महाजन देती अन्नदानाला ॥ आणी किती आले मदतीला । कसं सांगु त्यांच्या गणतीला । किती खूप यत्न जरि झाला । तरि थोडा पडला त्या वेळा ।





किती लोक मुकला प्राणाला । एक गांवचा हिशेब हा झाला । असे किती गांव सिंधूला । गेले वाहून ठाव कोणाला ? । गुरंढोरं मुकलीं प्राणाला । गांवच्या गांव वाहून गेला ! । चाळीस हजार बेकार झाला । असा आला दैवाचा घाला । याचा विचार दादांनीं ! केला पाहिजे तुह्मांला ॥ चाल ॥ असा झाला ईश्वरी कोप । दैवी संताप । केलं काय पाप । समजेना, झाला घोर प्रकार । आतां तुह्मी सांगा काय देणार । गप्प मुंबईला काय बसणार ? ॥ २ ॥

—: ३ :—

**परीक्षेचा** काळ हा आला । सोडा स्वार्थाला । धावं उदारपणें धर्मकार्याला । गरीबाचा दुवा तुह्मांला । दीनदुबळ्याला धावं मदतीला । ध्यावं पुण्याला ॥ ते आपलेच भाईबंद, नित्यसंबंध, । एक गोविंद । सांभाळ देव तोच करणारा । दोघांचा नित्य हो झाला । दया भूताला । दाखवुन गेला । प्राणि मुक्तीला ॥ चाल ॥ मदतीस नाहीं जर गेला । चाळीस हजार बेकार झाला । खास जी ॥ काळ हा कठिण बहु आला । धर्मावर येईल घाला । घोर जी ॥ चाल ॥ दानास योग्य हा काळ । झाले घायाळ । बंधु, सांभाळ । भाळशी स्वार्था । तरि येईल संकट आतां । घोर

जी ।। जरि एक हातःहा तुटला । वेदना सर्व अंगाला । लागती ।। पाहुनिया परदुःखाला । जो दुःखी आपण झाला । धन्य जी ।। जरि घाला गुजराथेला । मुंबईला झटका आला । पाहिजे ।। चाल ।। जपण्यास हिंद–लोकांस । हिंद–देशास । हिंद–धर्मास । सिद्ध हो वीरा । दीनांचा पालनवाला । आज जी ।। आधींच हिंदुधर्म रोडला । अन् त्यांत आली असली पीडा । घारीच्या देखीनं सारा चोर हो बसला ।। सापाच्या दातानं सज्ज झाला चावायला ।। वाघाच्या जबड्यानं बसला लोक गिळण्याला ।। विषाच्या जहरीनं बसला ठार करण्याला ।। देऊं नका वाव हो त्याला । जसं मास लावलं गळाला । अन् मग मासा त्यांत आडकला । त्यानं चिरलं त्याच्या नरड्याला । असले लोक घालतिल घाव, चला मदतीला ! ।। चाल ।। ही संधि आज तुह्मांस । आली हो खास । दानधर्मास । हिंदूनों ! धांवा आतां मदतीला । नाहींतर काळिमा आला । आपल्या नांवाला । विनवि तुह्मांला ।। ३ ।।

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

समाप्त.